# बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१४ गोंदिया | अंक ३८ | बुधवार,दि.२७ ऑगस्ट २०२५ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027




# रेल्वेचा वेग कमी करणे अडचणीचे

**गोंदिया:-** बल्लारशाह-चंद्रपूर-गोंदिया रेल्वे मार्गावरील वनक्षेत्रातून वेगात धावणाऱ्या रेल्वेमुळे अपघात होऊन दरवर्षी वाघांसह इतर अनेक वन्यजीव मृत्यूमुखी पडत आहेत. याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एक जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. संवेदनशील वनक्षेत्रातून रेल्वे जात असताना तिचा वेग ताशी १५ ते २० किमीने कमी करण्यात यावा, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे. मात्र, रेल्वेचा वेग कमी करणे अडचणीचे ठरू शकते, कारण तसे केल्यास रेल्वेचे या मार्गावरीलच नाही पुढील स्थानकांवरील वेळापत्रकालासुद्धा याचा फटका बसेल, असे मौखिक निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. त्यामुळे रेल्वेने स्वतःच यावर तातडीने उपाययोजना सूचवाव्यात, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तर

उदयन पाटील व स्वानंद सोनी या पर्यावरणप्रेमी नागरिकांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे. न्यायालयाने या याचिकेची गंभीर दखल घेतली. सर्वोच्च न्यायालयाने १० डिसेंबर २०१३ रोजी शक्तीप्रसाद नायक यांच्या प्रकरणामध्ये रेल्वेमुळे वन्यजीवांचा अपघात होऊ नये, याकरिता वनक्षेत्रातून धावणाऱ्या रेल्वेचा वेग कमी करण्यात यावा, वन्यजीवांना रेल्वेलाइनपासून दूर ठेवण्यासाठी जोरात भोंगा वाजविण्यात यावा यासह विविध निर्देश दिले होते. परंतु, केंद्र व राज्य सरकारने यासंदर्भात ठोस उपाययोजना केल्या नाहीत. त्यामुळे दरवर्षी अनेक वन्यजीवांना रेल्वे अपघातात प्राण गमवावे लागत आहे, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

या प्रकरणी रेल्वे व वन खात्याला दोन महिन्यांपूर्वीच नोटीस बजावण्यात आल्या आहेत. मात्र, अद्याप यावर उत्तर आलेले नाही. त्यामुळे रेल्वेने यावर दोन आठवड्यांत उत्तर दाखल करावे असे आदेश न्यायालयाने दिले. तसेच हे अपघात टाळण्यासाठी कुंपण घालता येईल किंवा नेमके काय करता येईल अशा उपाययोजनांही सुचवाव्यात न्यायालयाने दिले. याखेरीज वन खात्याने स्वतःहून या विषयावर रेल्वे प्रशासनाशी चर्चा करायला हवी होती, असेही मौखिक आदेश न्यायालयाने यावेळी दिले.

**याचिकाकर्त्यांनी सूचविलेले उपाय**

**संवेदनशील वनक्षेत्रात प्रवेश केल्यानंतर रेल्वेचा ताशी वेग १५ ते २० किलोमीटरपर्यंत कमी करण्यात यावा. यामुळे लोको पायलटला वन्यप्राणी दिसल्यास त्याला वाचविता येण्याची शक्यता निर्माण होईल.रेल्वेचा वेग तपासण्यासाठी यंत्रणा उभी करण्यात यावी. वेगाचे उल्लंघन करणाऱ्या चालकांवर कारवाई करण्यात यावी. वन्यजीव कोणत्या ठिकाणाहून रेल्वे लाइन ओलांडतात, याचा शोध घेऊन संबंधित ठिकाणी अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्या. वन्यजीवांचा वावर असलेल्या ठिकाणी भोंगे बसविण्यात यावे. रेल्वे येण्यापूर्वी भोंगे वाजवून वन्यजीवांना रेल्वे लाइनपासून दूर करावे.**


बल्लारशाह-चंद्रपूर-गोंदिया रेल्वे मार्गावर झालेल्या अपघातामुळे २००१ ते २०२१ या २० वर्षांत १३० वन्यजीव ठार झाले. त्यामध्ये वाघ, गरुड, अजगर, बिबट, तरस यासह शेड्युल १ श्रेणीतील इतर अनेक प्राण्यांचा समावेश आहे. ही रेल्वे लाइन २५० किलोमीटर लांब आहे. त्यापैकी ६० किलोमीटर लाइन ताडोबा-अंधारी व्याघ्र अभयारण्य, चंद्रपूर वनक्षेत्र, गोंदिया वनक्षेत्र व नवेगाव-नागझिरा व्याघ्र अभयारण्याच्या घनदाट व संवेदनशील वनक्षेत्रातून जाते. या लाइनवर रोज २४ प्रवासी रेल्वे व अनेक मालवाहू रेल्वे धावतात, अशी माहिती याचिकाकर्त्यांनी न्यायालयाला दिली आहे.

# देसाईगंज तालुक्यात जीवंत सातबारा अभियान मोहीमेला फासले हरताळ

**आमगावात अद्यापही १०३ मयतांचे नांव सातबारावर कायम,शासनाला दिशाभूल करणारी खोटी माहिती**

**गडचिरोली:-**महसूल विभाग १०० दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत दिनांक ०१ मार्च २०२५ पासुन बुलढाणा जिल्हयातील सर्व गावांमध्ये ङ्ग जिवंत सातबारा मोहिम राबविण्यात आले होते.सदर मोहिमेची शासनस्तरावर महसूल मंत्र्यांनी दखल घेवून सदर मोहिम संपुर्ण राज्यामध्ये राबविण्याबाबत्त निर्देश दिलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने दि.१९/३/२०२५ ला जिवंत सातबारा अभियान मोहीम राबविण्यासाठी शासन परिपत्रक निर्गमित केले होते. मात्र, गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज तालुक्यातील आमगाव साजामध्ये एक नव्हे तब्बल एकशे तीन मयतांचे नांव सातबारावर कायम असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली असल्याने महसुल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

१ एप्रिल ते ५ एप्रिल पर्यंत ग्राम महसूल अधिकारी यांनी त्यांच्या साजातील अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये चावडी वाचन करून न्यायप्रविष्ट प्रकरणं सोडून गावं निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करणं, ६ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत वारसांनासंबंधी आवश्यक कागदपत्रे सादर करून मंडळ अधिकारी यांचे मार्फत वारस ठराव ई फेरफार प्रणालीद्वारे मंजूर करणे, २१ एप्रिल ते १० मे या कालावधीत ७/१२ दुरुस्ती करुन सर्व जीवंत व्यक्ती ७/१२ वर नोंदविलेल्या असायला पाहिजे होतं.


नव्या स्वरूपातील सातबारा.

यात समन्वयक अधिकारी म्हणून तहसीलदार हे आपल्या अधिनस्त क्षेत्रात हा कालबद्ध कार्यक्रम विहित मुदतीत पूर्ण करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना अवगत करण्यात येऊन सदर कारवाई करण्याबाबत सक्त सुचना देण्याचे निर्देश शासन परिपत्रकात देण्यात आले होते.

मात्र,देसाईगंज तालुक्यातील आमगाव साझातील माहीती जिल्हाधिकारी कार्यालयास खोटी माहिती देऊन जवळपास शंभर पेक्षा जास्त अर्थात १०३ मयतांचे नांव सातबारा उतारा मध्ये अद्यापही कायम आहेत. यामुळे, शासनाच्या जीवंत सातबारा या अभिनव उपक्रमाला तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी आमगाव यांनी अक्षरशः हरताळ फासले आहे. ही बाब वरिष्ठांपासून पुर्णतः लपविण्यात आल्याचे सांगितले जात आहे. जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्यासह शासनापासून लपवून ठेवली असल्याने शासनाला खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल संबंधित तहसीलदार देसाईगंज तलाठी आमगाव व मंडळ अधिकारी देसाईगंज यांच्यावर काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

"जिवंत सातबारा मोहिम" अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. या दृष्टीकानातुन संपूर्ण राज्यात "जिवंत सातबारा मोहिम" राबविण्याचा निर्णय शासनस्तरावर घेण्यात आला असला तरी यापूर्वी वारसान फेरफातून हजारो रुपये मिळत होते,मात्र या अभिनव उपक्रमातून स्थानिक पातळीवरील अधिकाऱ्यांना कुठल्याही प्रकारची चिरीमिरी मिळत नसल्याने भ्रष्ट व भोंगळ कारभारामुळे सदर योजना लालफितीत चांगलीच फसली असल्याचे सांगितले जात आहे.

# नागपुरात पैसे द्या पैसे द्या,देवाभाऊ पैसे द्या कंत्राटदारांनी मागितली भीक




**नागपूर-**राज्यभरातील सर्वच सरकारी विभागातील कंत्राटदारांचे शासनाकडे दहा महिन्यापूर्वी विविध कामे पूर्ण केल्यावरही देयकापोटी ८९ हजार कोटी रुपये थकले आहे. वारंवार मागणी केल्यावरही पैसे मिळत नसल्याने शेवटी कंत्राटदारांनी नागपुरातील संविधान चौकात एकत्र येत चक्क सामान्य नागरिकांकडे भीक मागितली.

महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, जलजीवन मिशन (जलपुरवठा) व इतर विभागांमध्ये कंत्राटदारांकडून कोट्यावधींचे काम करण्यात आली. ही कामे पूर्ण झाल्यावरही शासनाकडून देयके पैसे दिली जात नाही. ही रक्कम एक वर्षांपासून थकलेली असतांना शासनाकडून पैसे मिळत नसल्याने कंत्राटदारांकडून वारंवार संबंधित विभागात चकरा मारल्या जात आहे. परंतु पैसे नसल्याचे सांगत त्यांना परत पाठवले जात आहे. त्यामुळे कंत्राटदारांची महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, नागपूर, कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन,विदर्भकॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन,स्टेटइंजिनिअर्स असोसिएशन,महाराष्ट्र स्टेट जल जीवन वॉटरसप्लाय कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन, स्टेट हॉटमिक्स असोसिएशन, स्टेट लेबर कोऑपरेटिव्ह असोसिएशन, फडरेशन ऑफ इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रसह इतरही संघटना संतापल्या आहे. या संघटनेकडून नागपुरातील संविधान चौकात मंगळवारी देयक मिळण्यासाठी ङ्गभीक मांगो ङ्ग आंदोलन करण्यात आले. आदोलनात कंत्राटदारांनी काळ्या रंगाच्या टी शर्ट घालून नागरिकांना भीक मागितली. त्यानंतर आंदोलकांची परिसरात भाषणे झाली. शासनाने तातडीने देयके अदा न केल्यास तिव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी दिला गेला.

कंत्राटदारांनी मागील १२ महिन्यांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री अनुक्रमे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना देयके अदा करण्याबाबत वेळोवेळी निवेदने दिली. सगळ्याच नेत्यांसोबत वेळोवेळी बैठकाही झाल्या. आश्वासनेही दिली गेली. परंतु एकही आश्वासने पूर्ण झाली नसून देयके मिळण्याचे चिन्ह दिसत नाही. त्यामुळे हे आदोलन करावे लागत असल्याचे संघटनेचे म्हणने आहे.

शासनाकडून देयकाचे पैसे अदा केले गेले नसल्याने सांगलीतील एका कंत्राटदाराने (हर्षल पाटील) काही आठवड्यापूर्वी आत्महत्या केली होती. तर वर्ध्यातील एका कंत्राटदाराने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतरही शासनाला कंत्राटदाराचे प्रश्न सोडवण्याबाबत जाग येत नाही. शेवटी यांसारख्या घटनांसह मोठी रक्कम शासनाकडे थकल्याने आर्थिक कोंडी होऊन कंत्राटदारांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला आहे. वेळीच देयक न मिळाल्यास कंत्राटदारांच्या आत्महत्या वाढण्याची शक्यताही आंदोलकांनी वर्तवली.

गोंदिया जिल्ह्यातील महाराष्ट्र शासनाच्या वतीने विविध विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शासकीय योजनांमधील मंजूर विकास कामे पूर्ण झाली असून मागील २०२३-२०२४, २०२४-२०२५ पासून आमची देयके प्रलंबित आहेत. पूर्ण झालेल्या कामाची बिल व इतर कागदपत्रे संबंधित विभागाकडे सादर करण्यात आले आहेत.प्रलंबित देयकांमुळे संबंधित कंत्राटदार, कामगार व संबंधित संस्था यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे नविन विकासकामे अपूर्ण राहून नविन विकास कामे होण्यात अडथळे निर्माण होत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

या आंदोलनात अजयजीत एम. वालिया, विजय अग्रवाल,शैलेष जायस्वाल, प्रणव रावत,अभिषेक जैन,प्रविण ठाकुर, आनंद ठाकूर,विनोद नाकाडे,अजय सेंगर, सुनिल तरोणे, अनिल बिसेन, राजीव शेलके, प्रतिक कदम, प्रमानंद टेंभुर्णीकर, अजय टाह, निरज ठाकूर,प्रदिप मेश्राम,प्रमोद बिसेन,पारस कटकवार, सुमित शेंडे, छन्नीलाल अगडे, युगेश बिसेन,उमेश कापसे, निरज अग्रवाल,योगेश शुक्ला, महेश अग्रवाल,संतोष भेलावे,फतेहसिंग,राजेश चौव्हान, रवी भरणे, प्रतिश गौतम, अशोक लिचडे, संजय मुरकूटे, सुधीर मानकर, दिलीप अग्रवाल, तजेंद्र छाबरा यांच्यासह अनेक कंत्राटदार सहभागी झाले होते.

# १ सप्टेंबरपासून बदलणार "हे' ५ नियम

**नवी दिल्ली-**सप्टेंबरच्या पहिल्याच दिवशी आर्थिक जगतात काही महत्त्वाचे बदल लागू होणार आहेत. चांदीच्या खरेदी-विक्रीतील पारदर्शकता, SBI क्रेडिट कार्डचे नवे शुल्क, एलपीजी सिलेंडरच्या किमतींतील नियमित फेरबदल, काही बँकांच्या अढच वापर नियमांचा पुनर्विचार आणि ऋऊ व्याजदरांतील संभाव्य बदलङ्घया सगळ्यांचा थेट परिणाम घरगुती बजेटवर होऊ शकतो. त्यामुळे खर्चाचे नियोजन आणि कॅशफ्लो मॅनेजमेंट आधीच करून ठेवणे हितावह ठरेल.या बदलांच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांनी आपल्या वापराच्या सवयी, पेमेंट मोड्स आणि गुंतवणुकीचे पर्याय यांची नव्याने उजळणी करणे आवश्यक आहे. चांदीत खरेदी करताना दर्जा तपासणे, कार्डवरील शुल्करचना समजून घेणे, एलपीजीसाठी मासिक तरतूद ठेवणे, अढच व्यवहार मर्यादेत ठेवणे आणि FD साठी योग्य कालावधी निवडणेही पाचही आघाड्यांवरील छोटी काळजी मोठा दिलासा देऊ शकते.सरकार चांदीच्या व्यवहारात अधिक पारदर्शकता आणण्याच्या तयारीत आहे. हॉलमार्किंगचा विस्तार झाल्यास चांदीच्या गुणवत्तेचे प्रमाणीकरण सोपे होईल आणि बाजारात विश्वासार्हता वाढेल. मात्र कठोर मानकांमुळे किंमतींवर परिणाम दिसू शकतो. दागिने वा इनव्हेस्टमेंट-ग्रेड चांदी घेताना प्रमाणपत्र, शुद्धता आणि बिलातील तपशील काळजीपूर्वक तपासणे गरजेचे ठरेल. SBI कार्डधारकांसाठी १ सप्टेंबरपासून शुल्करचनेत बदल होण्याची शक्यता वर्तवली जाते. बिल पेमेंट, इंधन खरेदी किंवा ऑनलाइन शॉपिंगवरील शुल्क वाढ, ऑटो-डेबिट फेल झाल्यास सुमारे २% पेनल्टी, आंतरराष्ट्रीय व्यवहारांवरील अतिरिक्त शुल्क आणि रिवॉर्ड पॉइंट्सच्या मूल्यामध्ये कपातङ्घअशा तरतुदींचा उल्लेख समोर येतो.

# पोलीस दलातील ३६४ सहा. पोलीस निरिक्षकांना पदोन्नती

गोंदिया- गोंदिया पोलीस दलातील चार सहाय्यक पोलीसनिरीक्षकांसह भंडारा, गडचिरोली, चंद्रपूरातील प्रत्येकी २ अशा राज्यातील तब्बल ३६४ सहाय्यक पोलिस निरीक्षकांचा समावेश आहे. यासंदर्भातील आदेश पोलिस महासंचालक कार्यालयाने २१ ऑगस्ट रोजी जारी केले आहे.

गेल्या महिन्यात या सहायक पोलीस निरीक्षकांना दिल्या जात असलेल्या पदोन्नतीला १०७ क्रमांकाच्या तुकडीच्या काही अधिकाऱ्यांनी प्रशासकीय लवादा समोर आवाहन दिल्याने त्यांची पदोन्नती रखडली होती. महिनाभरापासून आदेश अडकून होते. दोन दिवसांपूर्वी लवादाच्या दिल्या जाणाऱ्या आदेशाला अधीन राहून पदोन्नतीचे आदेश काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता यांनतर २१ ऑगस्ट रोजी पोलीस महासंचालक कार्यालयाने राज्यातील तब्बल ३६४ सहायक पालीस निरीक्षकांच्या पदोन्नती व नव्या नियुक्तीचे आदेश जारी केले. गोदितील ईश्वर हनवते, संजय नाईक यांना नागपूर ग्रामीण, अतुल तवाडे यांना नागपूर शहर तर नितीन वडते यांना पोलीस प्रशिक्षण विद्यालय नागपूर येथे पदोन्नती मिळाली आहे. भंडारातील सतीष बनसोडे यांना भंडार्यातच तर विनोद गिरी यांना वर्धा येथे बढती मिळाली आहे. गडचिरोलीतील प्रमोद बघेले यांना नागपूर शहर, गणेश फुलवकर यांना नागपूर ग्रामीण आणि चंद्रपूरातील सुधाकर कोकोडेंना चंद्रपूर व देवाजी नरोट यांना नागपूर शहरात पदोन्नती देण्यात आली आहे. उशिरा का होईना पदोन्नतीचे आदेश निर्गमित झाल्याने पोलिस दलात उत्साहाचे वातावरण आहे.

राज्यातील पोलीस दलातील जानेवारी ते डिसेंबर २०२४ या कालावधीत रिक्त झालेल्या पदांवर भरतीचा निर्णयही २० ऑगस्ट रोजी शासनाने घेतला आहे. यात पोलीस शिपाई १२३९९, पोलिस शिपाई चालक २३४, बॅण्डस्मन २५, सशस्त्र पोलीस शिपाई २३९३ आणि कारागृह शिपाई ५८० अशी १५६३१ पदे लवकरच भरली जाणार आहेत. त्यामुळे येत्या वर्षभरात पोलीस दलातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना मोठ्या प्रमाणांत पदोन्नती मिळणार असल्याने संपूर्ण पोलीसस दलात आज तरी आनंदाचे वातावरण आहे.

## सिलिंडरच्या स्पोटात तीन घरे जळून खाक

**गोंदिया:** जिल्ह्यातील आमगाव पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या जामखारी गावात सिलींडरच्या झालेल्या स्पोटात तीन घर जळून राख झाल्याची घटना २५ आँगस्ट रोजी सकाळी ११.४५ वाजेच्या सुमारास घडली.आग लागताच आमगाव नगरपरिषदेतील अग्निशमन वाहनाला पाचारण करुन आगीवर नियंत्रण आणण्यात आले.दरम्यान आगीतून साहित्य बाहेर काढतांना दोन-तीन युवकांना हाताला जखमी झाल्याने त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहे.सविस्तर असे की,आमगाव तालुक्यातील जामखारी येथील माजी सरपंच श्रीराम कटरे यांच्या घरी सकाळच्या सुमारास स्वयंपाक सुरु असताना अचानक सिलिंडरचा स्पोट होऊन घराच्या छतावर असलेल्या तणसाने पेट घेतल्याने गोवर्धन कटरे, हेमंत कटरे व खिलेश्वर कटरे यांची घरे पूर्णतः जळून खाक झाली.यात अंथरूण, कपडे, अन्नधान्य, रोख रक्कम असे साहित्य भस्मसात झाले असून सुमारे पाच लाखांहून अधिक आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.नागरिकांच्या सतर्कतेमुळे सुदैवाने जीवितहानी टळली.आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दल व पोलीस पथकाने प्रयत्न केले.तहसीलदार मोनिका कांबळे व पोलीस निरीक्षक राणे यांनी घटनास्थळी भेट देऊन तलाठ्यास पंचनामा करण्याचे निर्देश दिले.

# नागपूर महानगरपालिकेच्या पदभरतीत आरक्षण चोरी! ओबीसींना शून्य जागा?



**नागपूरः-** महापालिकेत गट 'क' संवर्गातील विविध १७४ पदांसाठी पुन्हा महाभरती होणार आहे. या भरतीमध्ये इतर मागासवर्गासाठी (ओबीसी) केवळ सहा जागा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या पदभरतीवर आक्षेप घेतला जात असून ओबीसींच्या जागा वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेच्या आस्थापनेवर विविध पदांच्या सरळसेवा भरतीसाठी ऑनलाईन अर्ज मागवण्यात येत आहेत. कनिष्ठ लिपिक-६०, विधि सहायक-०६, कर संग्राहक-७४, ग्रंथालय सहायक-८, स्टेनोग्राफर-१०, लेखापाल/रोखपाल-१०, सिस्टीम ॲनॅलिस्ट-१०, हार्डवेअर इंजिनीअर-२, डेटा मॅनेजर-१, प्रोग्रामर-२ अशा एकूण १७४ पदांसाठी पात्र आणि इच्छुक उमेदवारांनी २६ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत https://nmcnagur. gov. in या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. मात्र, ओबीसी युवा अधिकार मंचाने या भरतीवरच आक्षेप घेतला आहे.

ओबीसी युवा अधिकार मंचाच्या वतीने उमेश कोरीम यांच्या नेतृत्वात महापालिका उपायुक्त विजया वनकर यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनानुसार, 'कनिष्ठ लिपिक' या पदासाठी ६० जागा निर्धारित आहेत. यामध्ये ओबीसी विद्यार्थ्यांसाठी आरक्षणाप्रमाणे १२ जागा देणे क्रमप्राप्त होते. परंतु, जाहिरातीत ओबीसी प्रवर्गाला एकही जागा देण्यात आली नाही. त्याचप्रमाणे 'कर संग्राहक' या पदासाठी ७४ जागा निर्धारित करण्यात आल्या आहेत. यामध्येसुद्धा ओबीसी प्रवर्गासाठी १४ जागा राखीव असणे आवश्यक होते. परंतु, यामध्येही ओबीसी प्रवर्गाला एकही जागा देण्यात आली नाही.

महापालिकेने दिलेल्या जाहिरातीनुसार १० वेगवेगळ्या पदांसाठी १७४ जागांपैकी ३४ जागा ओबीसींसाठी आरक्षित राहणे अपेक्षित होते. परंतु फक्त ६ जागा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या जाहिरातीवर आक्षेप घेण्यात आला. निवेदन देतेवेळी उमेश कोरीम यांच्यासह शुभम तिखट, विनीत गजभिये, दिलीप दुर्गे सर्व समन्वयक, स्टुडंट्स राईट्स असोसिएशन,नागपूर शहर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# भंडारा जिल्ह्याचे नवे पालकमंत्री भोयर,सावकारेंना हटवले



**भंडारा:-**ऐन गणेशोत्सवाच्या पर्वावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भंडारा जिल्ह्यातील जातीय समीकरण सांभाळण्याच्या दृष्टीने भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री बदलल्याचे बोलले जात आहे. संजय सावकारे यांच्या जागी आता गृहराज्यमंत्री पंकज भोयर हे भंडाऱ्याचे नवीन पालकमंत्री असणार आहेत.

संजय सावकारे यांचे डिमोशन झाल्याचे कळते, त्यांना आता बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे.मागील काही दिवसांपासून संजय सावकारे यांच्यावर भंडाऱ्यात फक्त १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारीसारख्या कार्यक्रमांना हजेरी लावण्याचा ठपका ठेवण्यात येत होता. नागरिकांमध्ये स्वतःच्या जिल्ह्यातला किंवा परिसरातील पालकमंत्री असावा अशी मागणी होती.त्यातच शिवसेनेचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांचे वाढते वलय कमी करण्याकरीता भाजपच्याच एका आमदाराच्या आग्रहाच्या कारणामुळे सावकारे यांची उचलबांगडी झाली असावी अशी चर्चा आहे. नवनियुक्त पालकमंत्री पंकज भोयर हे वर्धा जिल्ह्यातील कुणबी समाजाचे नेते असल्याने, भाजप आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांवर आपली पकड मजबूत करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेतला असावा अशीही चर्चा सुरू आहे.

# जिल्ह्यातील ७८६ एनएचएम कर्मचाऱ्यांचा संप सुरूच

**गोंदिया :-** राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचएम) अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी १४ मार्च २०२४ च्या निर्णयानुसार सेवत कायम करण्यात यावे. या मागणीसाठी १९ ऑगस्टपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केले आहे. सहा दिवसांपासून कर्मचाऱ्यांचा संप सुरू असून, त्याची शासनाने अद्यापही दखल घेतली नाही. त्यामुळे एनएचएम कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून (दि. २५) येथील जि. प. कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरु केले. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत कामबंद आंदोलन मागे घेणार नाही, अशी भूमिका एनएचएम कर्मचाऱ्यांनी घेतली आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समिती महाराष्ट्र राज्य गोंदिया शाखेच्या वतीने जिल्ह्यात हे आंदोलन १९ ऑगस्टपासून सुरू आहे. एनएचएम कंत्राटी कर्मचाऱ्यांनी त्यांना शासकीय सेवेत कायम करण्यात यावे, या मागणीसह इतर मागण्यांकडे वांरवार शासनाचे लक्ष वेधले, पण शासनाने केवळ आश्वासनावर वेळ मारून नेली. या अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचे आश्वासन दिले, पण त्याची सुद्धा पूर्तता अद्याप केली नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये रोष व्याप्त आहे. जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत काम बंद आंदोलन मागे न घेण्याची भूमिका संघटनेनी घेतली आहे. सहा दिवस लोटूनही शासनाने एनएचएम कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची दखल न घेतल्याने सोमवारी या कर्मचाऱ्यांनी जि.प. कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून निषेध नोंदविला.

शासनाने एनएचएम कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण न केल्यास हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला आहे. तसेच, या आंदोलनात सर्वच एचएचएम कर्मचारी सहभागी होणार आहे. यामुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था कोलमडण्याची शक्यता नाकारता येत नाही.




**को.वि.उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, देवरी यांचे कार्यालय**

प्रकरण क्र.७/एम.आर.सी.८१/२०२५-२६
मौजा-पिंडकेपार ता.देवरी जि.गोंदिया
दिनांक-१४/०८/२०२५

**जाहिरनामा**

ह्या जाहिरनाम्याद्वारे सर्व लोकांना माहितीस्तव जाहीर करण्यात येतेकी श्री. भोजराज दागो दिहारी रा.पिंडकेपार ता.देवरी जि.गोंदिया यांनी त्यांची आई रत्नाय दागो दिहारी यांची मृत्यू नोंद दिनांक २७/०२/१९९४ रोजी ग्रा.पं. पिंडकेपार ता.देवरी जि.गोंदिया येथे करण्याकरिता मागणी केली आहे. ज्या कोणास यावर आक्षेप घ्यावयाचे आहे. त्यांनी लेखी आक्षेप जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत न चुकता सादर करावे. उशिरा प्राप्त झालेल्या अर्जावर कोणताही विचार करण्यात येणार नाही ह्याची नोंद घ्यावी. सदर जाहिरनामा अर्जदार यांनी स्वखर्चाने स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावे.

**उपविभागीय अधिकारी,**
**देवरी**

# नवीन महामार्ग मूर्ती विसर्जनात अडथळा



## आ.अग्रवालांचे प्रवेश रस्ता करण्याचे निर्देश

### सातोना येथील महादेव घाट परिसराची केली पाहणी

**या वर्षी कोरणी घाटावरील अडथळा दूर करून मूर्ती विसर्जनाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आ. अग्रवाल यांनी सातोना येथील बाघ नदीवरील महादेव घाटाची पाहणी केली. नदीकडे जाणारा रस्ता रुंदीकरण करण्यासाठी आणि घाट परिसराचे पुनरुज्जीवन करण्यासाठी त्यांनी सातोना सरपंच संदीप तुरकर यांच्याशी सविस्तर चर्चा केली. गोंदिया शहर आणि ग्रामीण भागातून शेकडो मूर्ती बाघ नदीत विसर्जित केल्या जातात हे उल्लेखनीय आहे. विसर्जन अडथळामुक्त व्हावे यासाठी नवीन पर्याय तयार करणे आवश्यक झाले आहे, ज्यासाठी आ. अग्रवाल यांची भूमिका सकारात्मक आहे.**

**गोंदिया:–** शहरात श्री गणेशाच्या आगमनाची तयारी जोरात सुरू आहे. बुधवार (दि. २७) पासून बाप्पाचे आगमन होणार आहे. एकीकडे बाप्पाच्या आगमनाबद्दल उत्साह आहे, तर दुसरीकडे सार्वजनिक मंडळेही प्रस्थानाबद्दल चिंतेत आहेत. चिंतेचा विषय म्हणजे राजेगाव बाग नदीवर बांधलेला नवीन राष्ट्रीय महामार्ग आहे. कोरणीच्या बाघ नदी घाटावर नवीन राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामामुळे मूर्ती विसर्जनात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. महामार्गाखाली बांधलेल्या अंडरपासमधून शहरातील श्री गणेश आणि माँ दुर्गेच्या बहुतेक मोठ्या मोठ्या मूर्ती नेणे शक्य नाही. त्याचवेळी विसर्जन क्षेत्रात बांधलेल्या रस्त्यावरील ढिगाऱ्यांमुळे परिस्थिती गंभीर आहे.


या संदर्भात अनेक सार्वजनिक गणेश उत्सव मंडळे आणि दुर्गा उत्सव समित्यांनी परिसरातील आ. विनोद अग्रवाल यांना मूर्ती विसर्जनातील अडथळ्यांबद्दल माहिती दिली होती. त्या सोडवण्याबाबतही चर्चा

केली होती. आ. अग्रवाल यांनी मूर्ती विसर्जनाच्या या गंभीर समस्येला प्राधान्य देत आज जिल्हा दंडाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांसह राजेगाव बाघ नदी घाटावर पोहोचले आणि विसर्जन क्षेत्राची पाहणी केली. निरीक्षणादरम्यान असे दिसून आले की गोंदियाहून मूर्ती थेट लहान कल्व्हर्टवरून विसर्जन क्षेत्रात नेणे शक्य नाही. नव्याने बांधलेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या अंडरपासची उंची कमी असल्याने नदी घाटाकडे जाणारा रस्ताही महामार्गाच्या ढिगाऱ्याखाली गाडला गेला आहे, ज्यामुळे अडथळा निर्माण होत आहे आ. अग्रवाल यांनी महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून नदीच्या पलीकडे असलेल्या रजेगाव (मध्य प्रदेश) पासून रस्ता लवकरात लवकर व्यवस्थित करण्याचे आणि कोरणी घाटाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील कचरा लवकरात लवकर काढून रस्त्याची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले. जेणेकरून परतीच्या प्रवासादरम्यान वाहन सहजपणे अंडरपासमधून जाऊ शकेल.

राष्ट्रीय महामार्गावर बांधणार दुभाजक नवीन राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामादरम्यान, महामार्ग प्राधिकरणाने मुरपार, धामणगाव आणि सातोना येथे रस्ता तयार केला आहे आणि गावाकडे जाणाऱ्या मार्गात अडथळा निर्माण केला आहे. गावकऱ्यांना बस स्टॉपवर जाण्यासाठी दुभाजकावरून उडी मारून आणि वाहनाने लांब अंतर प्रवास करून रस्ता ओलांडावा लागतो.

या प्रकरणी आ. अग्रवाल यांनी महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना गावाजवळील अप्रोच रोडवर दुभाजक क्रॉसिंग उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या छिंदवाडा विभागातील मंडल, बिसेन, अनुप कटरे, सातोना सरपंच तुरकर, कदम, वासनिक, येवले आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# मायेच्या कुशीत शिरायला मुले तयार; प्रेमाच्या वाटेत अडथळे कशाचे ?



**गोंदिया:–** आपल्या घरी बाळ जन्माला येणार असेल, तर आपण किती अधीर असतो. दत्तक मुलाच्या बाबतीतही अशीच अधिरता पालकांच्या मनात काहूर माजवत असते. त्यात ही प्रक्रिया लांबली, तर मग पालकांची अस्वस्थता वाढते. हीच अस्वस्थता कमी करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. मुला-मुलींना दत्तक घेण्याची प्रक्रिया केंद्राने सुलभकेली आहे. न्यायालयास असणारे दत्तक प्रक्रियेचे अधिकार आता जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे सन २०२२ पासून आतापर्यंत गोंदिया जिल्ह्यातील तब्बल ४२ दाम्पत्यांना हक्काचे मबाळफ मिळाले आहे.

गेल्या काही वर्षापासून स्वतःला मूल होत नाही, म्हणून तसेच स्वतःचे मूल असतानाही मूल दत्तक घेण्याचे प्रमाण वाढले आहे. पूर्वी कुटुंबातील मुलेच दत्तक घेतली जात होती; परंतु त्यातून सांपत्तिक वाद तयार होऊ लागले. मुलांची संख्याही कमी झाल्याने नात्यातील मूल दत्तक घेण्यावर मर्यादा आली. अशा प्रकारची दत्तक प्रक्रिया बंदच झाली. एक मूल असताना लोक आनंदाने दुसरे मूल दत्तक घेत आहेत.

### १८ वर्षापर्यंतच्या मुलास दत्तक घेऊ शकता

**दत्तक घेण्यासाठी हिंदू अॅडॉप्शन अॅण्ड मेन्टेनन्स अॅक्ट १९५६ आणि बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०१५ नुसार वेगवेगळ्या तरतुदी आहेत. पहिला कायदा केवळ हिंदूंसाठीच आहे. बाल न्याय कायद्यानुसार कोणत्याही धर्मातील व्यक्ती किंवा कुटुंब मूल दत्तक घेऊ शकतात. केवळ तान्ह्या बाळालाच नव्हे, तर अठरा वर्षांपर्यंतच्या कोणत्याही मुलास दत्तक घेता येते. ही ऑनलाइन व पारदर्शी प्रक्रिया असून, त्यासाठी केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरणाची (कारा) वेबसाइट आहे. वेबसाइटवर नाव नोंदवले की, मूल दत्तक देण्याचा निर्णय आतापर्यंत जिल्हा न्यायाधीशांसमोर होत असे, परंतु त्यांच्याकडे न्यायालयीन कामाचा ताण जास्त असल्याने या प्रक्रियेस विलंब लागत होता. मख्यतः मोठ्या शहरांत खटल्यांचे प्रमाण जास्त असल्याने दत्तक प्रक्रियेचे आदेश लवकर होत नव्हते. आता हे काम जिल्हाधिकाऱ्यांकडे देण्यात आले आहे.**

| सन | दत्तक घेतलेल्या बाळांची संख्या |
|---|---|
| २०२१-२२ | ०५ |
| २०२२-२३ | ०८ |
| २०२३-२४ | १३ |
| २०२४-२५ | १७ |

### ऑनलाइन करावा लागतो अर्ज

**गेल्या काही वर्षात मूल दत्तक घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करणे अनिवार्य करण्यात आले आहे. केंद्र सरकारने आता कायद्यात केलेल्या सुधारणेला मान्यता मिळाल्यानंतर ही प्रक्रिया अधिक सोपी झाली. गोंदिया जिल्ह्यात वर्षनिहाय असे दत्तक घेतले.**

अंध, अपंग मुलांनाही दत्तक घेणारे काही विशाल हृदयाचे पालक आहेत.

# स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही 'या' गावांना एसटीची प्रतीक्षा



**देवरी:–** स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांनंतरही देवरी तालुक्यातील आदिवासी भागातील अनेक गावे एसटी बसच्या सुविधेसाठी आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत. ग्रामपंचायत म्हैसुली अंतर्गत महाजनटोला, बिचटोला, मडावीटोला (म्हैसुली) या गावांतील लोकांनी लोकप्रतिनिधींच्या फोल ठरलेल्या आश्वासने बाजूला ठेवत, राज्य परिवहन मंडळाला साकळा घातला आहे. या गावांची एकूण लोकसंख्या ७३२ असून, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, गावकऱ्यांना शासकीय कामांसाठी आणि वैद्यकीय उपचारांसाठी बस सुविधा उपलब्ध नसल्यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

अमृत महोत्सव साजरा होत असताना प्राथमिक सोयीसुविधा नसल्यामुळे ग्रामस्थांना गंभीर त्रास सहन करावा लागत आहे.तालुक्याचे मुख्य केंद्र असलेले देवरी येथून देवरी, चिचगड ते म्हैसुली या मार्गावर बस सुविधा सकाळी ९:०० ते दुपारी १:०० आणि सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत सुरू करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी अनेकदा निवेदन व प्रतिवेदनाद्वारे केली आहे. यासाठी संपूर्ण मार्गावर सर्वेक्षण देखील करण्यात आले होते. ज्यात मरामजोब, मासुलकसा, मंगेझरी, म्हैसुली ते म्हैसुली फाटा बस


स्टॉपपर्यंतचा समावेश होता. मात्र, २०२३-२४ मध्ये झालेल्या या सर्वेक्षणानंतरही म्हैसुली येथील आदिवासी व गोरगरीब जनतेचा अद्याप विचार होऊन बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. बस सुविधेच्या अभावामुळे ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी पुन्हा एकदा या विषयावर जोरदार मागणी केली आहे.या मागणीसाठी जगन सलामे, राजकुमार सलामे, माणिक कोरेटी, विजय धुर्वे, बाबुलाल सलामे, जगत नुरेटी, हेमराज सलामे, अनिल कोरेटी, स्वप्निल कोल्हारे आणि ईश्वर कोल्हारे यांनी एकत्र येऊन निवेदन सादर केले आहे. त्यांनी राज्य आणि स्थानिक प्रशासनाकडे या समस्येचे गांभीर्य ओळखून त्वरित बस सेवा सुरू करण्याची विनंती केली आहे.

# सौंदड येथील उड्डाण पुलाचे बांधकाम थांबवले

**सडक अर्जुनी:–** मुंबई कोलकाता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४ वरील सौंदड येथे गेल्या पाच ते सहा वर्षांपासून उड्डाण पुलाचे बांधकाम राजदीप बिल्डकॉम कंपनीला देण्यात आले होते. अखेर, ही कंपनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) काढून प्राधिकरणहे, अशीच मकान आहे. नागपूरच्या इतर काही खासगी कंपनीला काम देण्यात आले आहे, परंतु ती कंपनीही काम करत नाही.

परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर ते रायपूर या रस्त्याच्या जाळ्यातून सर्व उड्डाण पुलाचे काम जलदगतीने करण्याचे आदेश दिले होते. परंतु खाजगी कंत्राटदाराच्या उद्धटपणामुळे गोंदिया जिल्ह्यातील तहसील रोड अर्जुनी येथील सौंदड गावातील रेल्वे फाटकावर उड्डाण पुलाचे बांधकाम थांबवण्यात आले आहे.

रेल्वे फाटकाची उंची कमी असल्याने दररोज सौंदड रेल्वे फाटकावरून ५२ फूट गाड्या वाहून नेणारे लांब ट्रेलर बाहेर काढले जातात. ट्रेलरची उंची कमी असल्याने खाजगी कंत्राटदार रात्रीच्या वेळी ट्रेलरमधून हवा काढून ट्रेलरला गेटवरून रवाना करतात. स्थानिक जनतेने माहिती दिली आहे की दररोज ३० ते ४० गाड्यांचे ट्रेलर रेल्वे फाटकातून बाहेर काढले जातात. प्रशासनासमोर हे घडत आहे परंतु कमिशनखोरीमुळे रेल्वे विभाग आणि इतर प्रशासन गप्प आहे.




**जर या पुलाचे बांधकाम लवकर पूर्ण झाल झाले कंत्राटदाराचा नसता. अधिकाऱ्यांना कमिशन दिले जाते. खात्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दरमहा कमिशन मिळते, म्हणूनच या पुलाचे बांधकाम होत नाही.**

**- महेश डुंभरे, शिवसेना युवा सेना**

### उड्डाण पुलाचे बांधकाम अर्धवट

**रात्री १२ नंतर टायर बाहेर टाकण्यासाठी आणि रेल्वे फाटक ओलांडण्यासाठी १५०० ते २००० रुपये आकारले जातात. जर या पुलाचे बांधकाम लवकर पूर्ण झाले असते तर चालकाला कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागला नसता. तसेच जनतेलाही कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागला नसता. परंतु कमिशनखोरीमुळे सौंदडच्या उड्डाण पुलाचे बांधकाम अर्धवट राहिले आहे.**

# गुन्हा करून आता नाही सुटणार; ही 'व्हॅन' जागेवर निकाल लावणार !



**गोंदिया :–** गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी फॉरेन्सिक वाहनांच्या संदर्भात राज्य शासनाने निर्णय घेतला खरा; परंतु त्याची अंमलबजावणी अद्याप झाली नाही. त्यामुळे जिल्ह्याला अद्यापपर्यंत नवीन फॉरेन्सिक वाहने व इतर सुविधा मिळाल्या नाहीत. शिवाय तज्ज्ञ कर्मचाऱ्यांचाही वानवा आहे. त्यामुळे या धोरणाची अंमलबजावणी कधी? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. नवीन फौजदारी प्रक्रिया संहितांतर्गत गुन्हे दाखल होण्याच्या प्रक्रियेत फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणे बंधनकारक केले आहे.

या अनुषंगाने राज्य शासनाच्या गृह विभागाने २२ जुलै २०२४ रोजी एक आदेश काढून राज्यात प्रत्येक जिल्ह्यासाठी एक मोबाइल फॉरेन्सिक वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेतला.

राज्यभरात २५४ मोबाइल फॉरेन्सिक वाहने खरेदी करणे आणि २६९ वाहनांवर आवश्यक असलेले मनुष्यबळ व फॉरेन्सिक किट, रसायन खरेदी सॉफ्टवेअर आदींचा प्रस्ताव मंजूर झाला होता. मात्र, जिल्हापातळीवर अद्याप नवीन वाहने उपलब्ध झाली नसून, मनुष्यबळही मिळाले नाही. त्यामुळे जुन्याच पद्धतीने आणि जुन्या उपलब्ध वाहनांच्या साहाय्याने तपासाची प्रक्रिया सुरू आहे. फॉरेन्सिक वाहन देण्याची वर्षभरापासून चर्चा आहे, पण वाहन मिळाले नाही.

**जिल्ह्यात किट उपलब्ध**

जिल्ह्यात एकही फॉरेन्सिक वाहन उपलब्ध नाही. त्या वाहनाच्या साहाय्याने दाखल झालेल्या गुन्ह्यांमधील आवश्यक असणारे पुरावे न्याय वैद्यशास्त्राच्या आधाराने घेतले जातात, परंतु हे वाहन जिल्ह्यात उपलब्ध नाही. प्रत्येक पोलिस ठाण्यात फॉरेन्सिक किट उपलब्ध आहेत.

**फॉरेन्सिक तपास म्हणजे काय?**

गुन्ह्यांची उकल करण्यासाठी वैज्ञानिक पद्धतीने केलेला तपास म्हणजे फॉरेन्सिक तपास. यात गुन्ह्यांशी संबंधित पुरावे गोळा करणे आणि त्याचे विश्लेषण करणे याचा समावेश आहे. तपासात नैसर्गिक आणि भौतिक विज्ञानाच्या पद्धतीचा वापर केला जातो.

**फॉरेन्सिक तज्ज्ञ असणार**

जिल्हा पोलिस दलात फॉरेन्सिक तज्ज्ञांची नियुक्ती करण्याचेही धोरण मंजूर केले आहेत. त्यासाठी गृह विभागाने सहायक रासायनिक विश्लेषक, वैज्ञानिक सहायक, वाहनचालक, प्रयोगशाळा परिचर अशी सुमारे २,२०० पदे भरण्यासाठी मंजुरी घेतली आहे. सुरुवातीला कंत्राटी तत्त्वावरील ही पदे भरती केली जाणार आहेत. परंतु, जिल्हास्तरापर्यंत कोणतीही प्रक्रिया सुरू नाही.

**परिस्थितीजन्य पुरावे घेणार**

नव्या फौजदारी प्रक्रियांतर्गत सात वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक शिक्षा असणाऱ्या गुन्ह्यांमध्ये न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा तज्ज्ञांकडून घटनास्थळावर भेट देऊन परिस्थितीजन्य पुरावे गोळा करणे बंधनकारक आहे. त्यामध्ये घटनास्थळाचे व्हिडीओ चित्रीकरण, तसेच रासायनिक विश्लेषणही केले जाणार आहे. यासाठी फॉरेन्सिक वाहनासोबत उच्च प्रतीचे कॅमेरेही उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

# तब्बल ८ महिन्यांपासून सैन्यदलातील जवान बेपत्ता



**गोंदिया:–** भारतीय सैन्यदलाच्या इनफन्ट्रीच्या मेरठमध्ये कार्यरत अर्जुनी मोरगाव तालुक्यातील कोहलगाव येथील सैनिक मेरठ येथे कार्यरत होता. त्याला काही दिवसांसाठी अरुणाचल राज्यात पाठविण्याचे आदेश मिळाले. आदेशाचे पालन करीत तो अरुणाचल राज्यात गेला. परत मेरठला जाण्यासाठी निघाला. मात्र दिल्ली रेल्वेस्थानकावरून तो ८ महिन्यांपूर्वी बेपत्ता झाला. अद्यापर्यंत त्याचा शोध घेण्यात प्रशासन अपयशी ठरले.

चैतराम गुनीलाल ताराम (२६, रा. कोहलगाव कान्होली, ता. अर्जुनी मोरगाव) हा भारतीय सैन्य दलाच्या इनफन्ट्रीतील मेरठच्या युनिटमध्ये गत ५ वर्षांपासून नोकरीला होता. मेरठ युनिटमधून त्याला काही दिवसांसाठी अरुणाचल प्रदेशात पाठविले होते. आपले कर्तव्य बजावून पुन्हा तो मेरठ युनिटला जाण्यासाठी निघाला. दिल्ली रेल्वेस्थानकावर १२ डिसेंबर २०२४ ला आला असता त्यांनी आपल्या वडिलांना फोन करून मी मेरठ युनिटला जात असल्याचे सांगितले. मात्र सदर जवान १२ डिसेंबरपासून बेपत्ता झाला, तेव्हापासून त्याचा फोनही लागत नव्हता. यासंदर्भात लष्कराकडून जुन्या दिल्ली पोलिस ठाण्यात हरविल्याची तक्रार नोंदविण्यात आली. तब्बल ८ महिन्यांपासून त्या जवानाचा अजूनही ठावठिकाणा लागला नाही. त्यामुळे चैतरामचे कुटुंबीय प्रचंड मानसिक तणावात आहे. एकमेव कमावता असल्याने ताराम कुटुंबीयांवर आर्थिक संकट कोसळले आहे. दिल्ली रेल्वेस्थानकावरून बेपत्ता झालेल्या जवानाची बॅग व साहित्य दिल्लीस्थानकावर मिळाले. त्याचे आधार कार्ड व ओळखपत्र राजस्थान पोलिसांना मिळाल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले.

**आमदारांकडे केला कुटुंबीयांनी पाठपुरावा**

बेपत्ता जवान चैतराम ताराम यांचा शोध घेण्यासाठी केंद्र व राज्य पातळीवर तातडीची कारवाई करण्यासंदर्भात त्याच्या कुटुंबीयांनी आ. राजकुमार बडोले यांना निवेदन दिले. बडोले यांनी शक्य असल्यास शोध घेण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन देऊन ताराम कुटुंबीयांची भेट घेत धीर दिला.

## बल्लारशाह रेल्वे नियोजित प्लॅट फॉर्मवरून सोडा

**गोंदिया:–** गोंदिया-बल्लारशाह ही प्लॅट फॉर्म १ किंवा २ वरून सोडली जात होती. आता काही दिवसांपासून सदर रेल्वे प्लॅटफफॉर्म ५ वरून सोडली जाते. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक यांना मोठा त्रास होतो. पायरी चढायला उतरायला मोठा त्रास होत असल्याचे प्रवाशी सांगतात. त्यामुळे ही रेल्वे जुन्याच प्लॅट फ ॅर्मवरून सोडावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

गोदिया बल्लारशाह या सर्व वेळेच्या गाड्या पूर्वीसारख्या जुन्या प्लॅट फॉर्मवर लावावी आणि परत येतानासुद्धा ती १ किंवा २ प्लॅट फॉर्म याठिकाणी यायला पाहिजे, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. रेल्वे विभागाने सावळागोंधळ करून सुरळीत चालणारी रेल्वेच्या वेळ आणि प्लॅटफफॉर्म बदलू नये. याचा फटका नागरिकांना मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

प्रवाशांचा गोंधळ थांबवा : प्लॅट फॉर्म १ व २ यावर जाण्यासाठी व येण्यासाठी वयोवृद्ध नागरिकांना सोयीचे होते. तसेच नोकरदार वर्ग, विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी, व्यावसायिक यांना इकडून तिकडे, तिकडून इकडे करण्यासाठी मोठी धावपळ होत आहे. यामुळे घाईगडबडीत जीवाला धोका होऊ शकतो हे नाकारता येत नाही.

**जंक्शनवर रेल्वे फिरवून नेऊ नका**

गोंदिया-बल्लारशाह किंवा बल्लारशाह-गोंदिया या रेल्वे जंक्शनवर तसेच जंक्शनवरून फिरवून नेऊ नका. हा विनाकारण त्रास वृद्ध नागरिकांना होत आहे. त्यामुळे या आधीच्या भीमनगर या मार्गाने रेल्वेचे आगमन व प्रस्थान करावे, अशीही मागणी जिल्ह्यातील प्रवाशांनी केली आहे.

**ही फार दिवसयासून मी आहे बदलावो लागते. कधी कधी जीवाला धोका होतो. म्हणून जूऱ्या जागी रेल्वे पाहिजे. - संबोधी बन्सोड, प्रवासी नागरिक, सिंदेवाही.**

**रेल्वे ही प्लॅट फॉर्म १-२ वर लावावी आणि आणावी. आमच्या सारख्या म्हातारी मंडळींना खूप त्रास होतो. - एल. बी. शहारे, ज्येष्ठ नागरिक, अर्जुनी मोरगाव.**

## दिव्यांग भोला बघेलेला रोलेटर वितरीत

**गोंदिया:–** तालुक्यातील जब्बारटोला येथील रहिवाशी मोहनसिंग बघेले यांचा लहान मुलगा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पांढराबोडी येथे इयत्ता ६ व्या वर्गात शिकत असून त्याला जन्मापासून सेरेब्रल पालसी हे दिव्यांगत्व असून त्यामुळे सुरळीत हलन चलन करण्यास समस्या येत होती. या करीता त्याला पांढरबोडी शाळेचे विशेष शिक्षक विजय ठोकणे यांनी त्याच्या पालकांना Physiothera{y साठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आणण्यास सांगितले. तेथे भोलाचे कार्यरत फिजिओथेरपिस्ट द्वारे मूल्यमापन करून पालकांना कोणकोणत्या व्यायाम आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. तसेच चालण्यास सहाय्य म्हणून रोलेटर ची गरज बोलून दाखवली.

# ऑनलाईन गेमिंगचे नियमन व प्रोत्साहन विधेयक मंजूर



**गडचिरोली :–** आजच्या डिजिटल युगात ऑनलाईन गेमिंगचे वाढलेले प्रमाण आणि त्याचे दुष्परिणाम रोखण्यासाठी लोकसभेत नियमन व प्रोत्साहन विधयक मंजूर करण्यात आले. या विषयावर खासदार डॉ.नामदेव किरसान यांनी सरकारचे लक्ष वेधले होते.

ऑनलाईन गेमिंगचे प्रमाण मोठ्या वेगाने वाढत असून त्याचे दुष्परिणाम समाजावर गंभीर स्वरूपात होत आहेत. लहान मुलांपासून तरुणाई व वृद्धांपर्यंत अनेक नागरिक या आभासी जगाच्या आहारी जात असल्यामुळे मानसिक व शारीरिक आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे व ऑनलाईन गेमिंगमुळे लहान मुलांचे जेवनाकडे दुर्लक्ष होऊन आरोग्यावर व अभ्यासावर सुद्धा मोठा परिणाम दिसून येत आहे. सोबतच या ऑनलाईन गेमिंगमध्ये आर्थिक फसवणुकीचे प्रमाण वाढत असल्याने अनेक जण आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात.

यासंदर्भात सरकारची काही भूमिका काय आहे? असा प्रश्न खा.डॉ.नामदेव किरसान यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान संसदेत उपस्थित करत केंद्र सरकारने ऑनलाईन गेमिंग संदर्भात कठोर कायदा करण्याची मागणी केली होती. त्यावर माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उत्तर देत सकारात्मक प्रतिसाद दिला होता. त्यांच्या प्रश्नाची दखल घेत केंद्र शासनाने ङ्गऑनलाईन गेमिंगचे नियमन व प्रोत्साहन विधेयक, २०२५ङ्ग हा कायदा तयार केला असून सदर कायदा लोकसभेत मंजूर करण्यात आला आहे.

या कायद्यामुळे ऑनलाईन गेमिंगच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीवर आळा बसेल, तरुण व बालकांच्या मानसिक आरोग्याचे रक्षण होईल, तसेच सुरक्षित व जबाबदार इंटरनेटसाठी हे महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असा विश्वास खासदार डॉ.किरसान यांनी व्यक्त केला आहे.

## जामखारी येथे सिलिंडरच्या स्पोटात तीन घरे जळून खाक,जिवितहानी टळली



**गोंदिया:–** जिल्ह्यातील आमगाव पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या जामखारी गावात सिलींडरच्या झालेल्या स्पोटात तीन घर जळून राख झाल्याची घटना २५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.४५ वाजेच्या सुमारास घडली. आग लागताच आमगाव नगरपरिषदेतील अग्निशमन वाहनाला पाचारण करुन आगीवर नियंत्रण आणण्यात आले.दरम्यान आगीतून साहित्य बाहेर काढतांना दोन-तीन युवकांना हाताला जखमी झाल्याने त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहे.

सविस्तर असे की,आमगाव तालुक्यातील जामखारी येथील माजी सरपंच श्रीराम कटरे यांच्या घरी सकाळच्या सुमारास स्वयंपाक सुरु असताना अचानक सिलिंडरचा स्पोट होऊन घराच्या छतावर असलेल्या तणसाने पेट घेतल्याने गोवर्धन कटरे, हेमंत कटरे व खिलेश्वर कटरे यांची घरे पूर्णतः जळून खाक झाली.यात अंथरूण, कपडे, अन्नधान्य, रोख रक्कम असे साहित्य भस्मसात झाले असून सुमारे पाच लाखांहून अधिक आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.नागरिकांच्या सतर्कतेमुळे सुदैवाने जीवितहानी टळली.आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी अग्निशमन दल व पोलीस पथकाने प्रयत्न केले.तहसीलदार मोनिका कांबळे व पोलीस निरीक्षक राणे यांनी घटनास्थळी भेट देऊन तलाठ्यास पंचनामा करण्याचे निर्देश दिले.या आगीत कुटुंब उघड्यावर पडले असून शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी कटरे कुटुंबाने केली आहे.

## अदानी फाउंडेशनचा स्थापना दिवस उत्साहात





**तिरोडा:–** अदानी फाउंडेशनने सोमवारी (दि. ११) २९ वा स्थापना दिवस साजरा केला. यानिमित्त, ६ ते ११ ऑगस्टदरम्यान अदानी फाउंडेशनने विविध सामाजिक आणि सामुदायिक कार्यक्रमांचे आयोजन केले. अदानी पॉवरचे प्रमुख मयंक दोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपक्रम यशस्वी पार पडले.

स्थापना दिवसानिमित्त महरित पर्यावरण की एक पहलफ या कार्यक्रमांतर्गत, बुधवारी (दि. ६) कवलेवाडा, मेहंदीपूर आणि बरबसपुरा या गावांमध्ये वनविभागाच्या सहकार्याने वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. यावेळी अदानी पॉवरचे प्रमुख मयंक दोशी, फाउंडेशनचे प्रमुख बिमूल पटेल, जि.प. सदस्य किरण पारधी, कवलेवाडा सरपंच इंदू पारधी, मेंदीपूरचे सरपंच धर्मदास चौधरी, बरबसपुराचे उपसरपंच राजेश परिहार, वनविभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते अदानी फाउंडेशनतर्फे चालू वर्षात २१ हजारांपेक्षा जास्त वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच २५ हजार वृक्षांची लागवड करणे प्रस्तावित आहे. गुरुवारी (दि. ७) बिरसी येथे मल्टिस्पेशालिटी आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात २५० हून अधिक रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधी देण्यात आली. यावेळी प्रामुख्याने सरपंच नंदकुमार शरणागत व ग्रामपंचायतचे इतर सदस्य उपस्थित होते.

शुक्रवारी (दि. ८) चिखली गावात कामधेनू प्रकल्पांतर्गत पशुवंधत्व निवारण व आरोग्य शिबिर घेतले. यात तज्ज्ञ पशुवैद्यकीयांनी २०० हून अधिक जनावरांची तपासणी करून उपचार केले. यावेळी ग्रा.पं. सरपंच कैलास पटले, उपसरपंच व सर्व सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तिरोडा पशुसंवर्धन विभागाचे सहकार्य लाभले. खैरबोडी, चुरडी जि. प. शाळांमध्ये आणि तिरोडा येथील उत्तर बुनियादी शाळेत मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून, भूमिपूजनाचा कार्यक्रमही पार पडला. यावेळी जि.प. सदस्य माधुरी रहांगडाले, खैरबोडी सरपंच विद्या टेंबरे, चुरडीच्या सरपंच सपना इनवते आदी उपस्थित होते.

# गोंदिया न.प.च्या प्रभाग रचनेत बदल,काहींच्या आशा पल्लवित

**गोंदिया :–** नगर परिषद, नगरपंचायतीच्या निवडणुका या पुढील दोन महिन्यांत होण्याची शक्यता आहे. त्याच अनुषंगाने प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. सोमवारी नगरपरिषद कार्यालयाच्या माहिती फलकावर गोंदिया नगर परिषदेच्या प्रारूप प्रभाग रचनेची घोषणा करण्यात आली. यावर आता ३१ ऑगस्टपर्यंत हरकती नोंदविता येणार आहे. गोंदिया नगर परिषदेत १ प्रभाग वाढल्याने आणि प्रभाग रचनेचे प्रारूप थोडेफार बदलल्याने काहींच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तर काहींच्या पदरी निराशा आली आहे.

गोंदिया स्थानिक संस्थामधील स्वराज्य ओबीसी आरक्षणाचा तिढा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर सुटला असून २७ टक्के ओबीसी आरक्षणानुसार निवडणुका होणार आहेत. या गोंदिया नगर परिषदेत सुद्धा एकूण ४२ जागांपैकी ११ जागा ओबीसीसाठी राखीव रा–हणार आहेत. नगर परिषदेच्या २१ व्या नगराध्यक्षासाठी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी त्यासाठी कंबर कसली असून मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे.

नगराध्यक्षपदासाठी कोण प्रभावी चेहरा ठरू शकतो याचा शोध राजकीय पक्षांकडून सध्या घेतला जात आहे. गोंदिया नगर परिषदेची स्थापना १

एप्रिल १९२० रोजी झाली. त्यावेळी गोंदिया शहराची लोकसंख्या २० हजार होती. तर सुरुवातीला केवळ १० प्रभाग होते, पण जसजसा शहर आणि लोकसंख्येचा विस्तार होत आहे तसतशी नगरसेवकांची संख्या वाढली. सध्या ही ४२ वर पोहोचली आहे. गोंदियाचे पहिले नगराध्यक्ष सेठ रामप्रताप लक्ष्मण अग्रवाल हे होते. तर पहिले मुख्याधिकारी म्हणून जी.व्ही. काणे यांनी काम पाहिले. नगर परिषद परिसराचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १८ चौरस




किमी असून आता गोंदिया शहराची लोकसंख्या १ लाख ६० हजारांवर पोहोचली आहे. १९४९ सी.पी. ॲन्ड बेरार अंतर्गत गोंदिया शहराचा विस्तार करण्यात आला. सन २०११ मध्ये शहरातील वॉर्डरचना बदलून त्याची प्रभागात विभागणी करण्यात आली. सध्या गोंदिया नगर परिषदेत पूर्वी २१ प्रभाग होते. यात आता एका नवीन प्रभागाची भर पडल्याने एकूण २२ प्रभाग झाले असून, ४४ नगरसेवक असणार आहेत. प्रभाग रचनेची घोषणा झाली तेव्हा अनेक प्रभागांच्या रचनेत बदल झाल्यामुळे इच्छुकांमध्ये आनंद आणि निराशाही दिसून आली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे राज्य सरकारने नगरपरिषद, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. ११ जूनपासून परिषदेच्या नगर निवडणुकांची प्रक्रिया सुरू करण्यात आली. १७ ते १८ जूनदरम्यान जनगणनेच्या माहितीवरून मिळालेल्या माहितीची पडताळणी करण्यात आली. १९ जून ते ३ जुलैदरम्यान जागेची पाहणी, ४ ते १० जुलैदरम्यान कार्यालयाच्या माहिती फलकावर जाहीर करण्यात आला आहे. प्रारूप प्रभाग रचनेची पाहणी करण्यासाठी नगरपरिषद कार्यालयात संभाव्य नगरसेवकांची मोठी गर्दी जमली होती. प्रभाग रचनेत २ प्रभाग जुन्या प्रभागांच्या रचनेत अनेक बदल झाले आहेत. ज्यामुळे काही संभाव्य उमेदवारांमध्ये ङ्गकही खुशी, कही गमङ्ग, असे वातावरण दिसून आले.

**सुनावणीनंतर अंतिम रचना**

२६ ते ३० सप्टेंबरदरम्यान गुगल मॅपनुसार नकाशे तयार करणे, ११ ते १७ जुलै या कालावधीत नकाशावर ठरविलेल्या प्रभागांची जागेवरच पाहणी करणे आणि १८ ते २४ जुलै या कालावधीत प्रारूप प्रभाग रचनेचा मसुदा तयार करून तो समितीकडे सुपूर्द करणे, असा कार्यक्रम ठरवून देण्यात आला होता.हा मसुदा सोमवारी नगरपरिषद ३ कार्यालयाच्या माहिती फलकावर प्रकाशित करण्यात आला. त्यामध्ये नागरिकांना ३१ ऑगस्टपर्यंत त्यांचे आक्षेप नोंदविता येणार आहे.

१ ते ८ सप्टेंबरदरम्यान प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या हरकती जिल्हा अधिकाऱ्यांकडून ऐकल्या जातील आणि सुनावणीनंतर वरील प्रभाग रचनेचा मसुदा ९ ते ११ सप्टेंबरदरम्यान नगरविकास विभागाकडे पाठविता योणार आहे. २६ ते ३० सप्टेंबरदरम्यान राज्य निवडणूक आयोगाकडून प्रभाग रचनेची अंतिम घोषणा केली जाईल.

# अंगणवाडीत नर्सरी ते केजी प्रयोग यशस्वी

## विद्यार्थ्यांना मिळेल शिक्षणाची सामान संधी, जि.प.च्या सर्वसाधारण सभेत होणार शिक्कामोर्तब

**गोंदिया:–** अंगणवाडीमध्ये विविध वयोगटातील बालकांना शिक्षण देताना त्यांच्या बुद्धीक्षमतेचा विचार करून शिक्षणाची पद्धत बदलण्याचा एक नाविन्यपूर्ण प्रयोग गोंदिया जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी त्यांच्या तुमखेडा बु. गा–वात राबविला. या प्रयोगाच्या यशस्वीतेच्या पार्श्वभूमीवर, हा उपक्रम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात किमान १० शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राबवावा, अशी मागणी रहांगडाले यांनी जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या बैठकीत केली. या प्रस्तावाला जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर आणि उपाध्यक्ष सुरेश हर्षे यांनी अनुमोदन देत, आगामी सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्याचे आश्वासन दिले. अंगणवाडीतील बालकांची बुद्धीक्षमता या



प्रयोगाच्या यशस्वीतेची दखल घेत स्थायी समितीच्या बैठकीत हा उपक्रम जिल्ह्यात विस्तारण्याची मागणी केली रहांगडाले यांनी यापूर्वीही जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात अनेक लोककल्याणकारी निर्णय घेतले. या नव्या उपक्रमातून विद्यार्थ्यांप्रती त्यांची आपुलकी आणि शिक्षणाविषयीची कळकळ दिसून येते. हा प्रयोग यशस्वी झाल्यास ग्रामीण भागातील बालकांच्या शिक्षणात क्रांतिकारी बदल घडू शकतो, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. आणि वयानुसार वेगळी असते.

सक्षम पालक आपल्या मुलांना नर्सरी, केजी १ आणि केजी २ मध्ये शिक्षण देतात आणि नंतर त्यांचा पहिलीत प्रवेश होतो. मात्र, आर्थिकदृष्ट?या दुर्बल पालकांची मुले पहिलीचे वय पूर्ण होईपर्यंत अंगणवाडीत राहतात. ही मुले शाळेत जातात, तेव्हा त्यांना इतर विद्यार्थ्यांसोबत स्पर्धा करावी लागते आणि ते मागे पडतात. या समस्येवर उपाय म्हणून रहांगडाले यांनी तुमखेडा बु. गावात एक अनोखा प्रयोग सुरू केला. त्यात बालकांना वयानुसार ३ गटांत विभागले. नर्सरी, केजी १ आणि केजी २. प्रत्येक गटासाठी पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य उपलब्ध केल्याने ही मुले पहिलीत गेल्यावर खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांसोबत सहज स्पर्धा करू शकतील

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी सज्ज व्हा-माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे



**सडक अर्जुनी:–** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार आहे. तसेच निवडणूक कार्यक्रमानुसार यंत्रणाही कामाला लागली आहे. त्यासाठी आतापासूनच आपण कामाला लागले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत अधिकाधिक जागा आपल्याला कशा प्रकारे जिंकून आणता येईल यासाठी आपला प्रयत्न व संघर्ष सुरू असला पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. ज्या कार्यकर्त्यांनी आमच्यासाठी झेंडे लावले आणि आम्हाला मदत केली. आम्ही त्यांच्यासाठी काम करणार आहोत. मात्र कार्यकर्ता म्हणून आपण येणाऱ्या निवडणुकीसाठी आपल्या मनाची तयारी ठेवली पाहिजे. एवढेच नव्हे तर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज असले पाहिजे. असे मौलिक विचार शिवसेनेचे नेते तथा माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी व्यक्त केले.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था च्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १९ ऑगस्ट रोजी माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांच्या एरिया ५१ कोहमारा येथील जनसंपर्क कार्यालयात प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक पार पडली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. सभेत प्रत्येक जिल्हा परिषद क्षेत्र, पंचायत समिती, नगरपंचायतीत पक्षाची सध्याची स्थिती काय आहे? सदस्य नोंदणी किती झाली आहे?


स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कशी तयारी झाली आहे? याबाबत चंद्रिकापुरे व अन्य नेत्यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्याकडून माहिती जाणून घेतली.

यावेळी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र नायडू, जिल्हा महिला प्रमुख माया शिवणकर, जिल्हा महिला उपाध्यक्ष सरिता कापगते, युवा जिल्हा प्रमुख अर्जुन बैस, तालुका प्रमुख विलास कापगते, विधानसभा प्रमुख जितेंद्र मौर्य, अनिल सोनकंवर, योगानंद परकीवॉर, महिलाप्रमुख सिंधुबारसागडे, तुलसीदास शिवणकर, पूजा राऊत, माधव तरोने, गिरीपाल फुले गोवर्धन खोब्रागडे, महेश डुंभरे, उमराव मांढरे, मधु हर्षे, कमलेश वालदे, नीलेश वाडकर, ओमराज दखणे, तेजराम चुटे, लक्ष्मीकांत तागडे, नवीन चक्रवर्ति, संतोष उइके, जणार्धन राऊत, राजेश आरसोडे, धरमलाल मांढरे, राजकुमार शहारे, चोखेलाल बडोले, अनमोल निकुरे, रोहित जनबंधू, दिनेश मसराम, करुणाताई गेडाम, संध्याताई श्रीरंगे, सरिताताई वैद्ये, ज्योति पंचभाई, निशा राऊत, अस्मिता बडोले, ज्योति राऊत, रेखा मेश्राम, राजेश्वर साखरे, अभय बडोले, अनिकेत बडोले, वीपेन्द्र बडोले, गौरव लंजे, सरिता मेश्राम, लक्ष्मी डोंगरवार, कैमवंता बडोले, विद्या खोब्रागडे, प्रणय कुंडे, सोनू बहेकार, प्रणय फुंडे, प्रमोद झिंगरे, नीलेश पारधी, सूरज मूनीश्वर, मंगेश मटाले, चंद्रपाल गायधणे, राजू चुटे, विठोबा भांडारकर, कपिल मेश्राम, विजय पंचभाई, करुणा उके, पपीता मेश्राम, सत्यशिला फुल्लुके, जगणनाथ लंजे तसेच तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गोंदिया शहरात होऊ शकते आरमोरीच्या घटनेची पुनरावृत्ती

**गोंदिया :–** शोमरूमची जीर्ण इमारत कोसळून तीन मजूर ठार झाल्याची घटना शुक्रवारी गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथे घडली. या घटनेनंतर जीर्ण इमारतींचा प्रश्न ऐरणीवर आली आहे. गोंदिया शहरातसुद्धा १२३ जीर्ण धोकादायक इमारती असल्याचे नगर परिषदेने केलेल्या सर्वेक्षणात पुढे आले आहे. विशेष म्हणजे शहरातील गोरेलाल चौक, रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत दोन जीर्ण इमारती असून त्या कोसळल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता आहे.

दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला नगर परिषदेतर्फे शहरातील जीर्ण



इमारतींचे सर्वेक्षण केले जाते. तसेच ज्या इमारती जीर्ण धोकादायक आहेत त्या इमारत मालकांना नोटीस बजावून इमारत पाडण्याची सूचना केली जाते.

## नोटीसच बजावणार की थेट कारवाई करणार

**शहरातील जीर्ण इमारतींपासून कुणालाही धोका होऊ नये, यासाठी नगर परिषद अशा इमारतींचे कर विभागातील मोहरीलच्या माध्यमातून सर्वेक्षण करते. तसेच अशा मालमत्ताधारकांना नोटीस बजावून अशा जीर्ण इमारती पाडण्याबाबत कळिवते. दरवर्षी अशाच प्रकारे नोटीस बजावली जाते. मात्र, मालमत्ताधारक जीर्ण इमारती पाडत नसल्याचेही दिसते. यंदाही नगर परिषदेने अशा जीर्ण मालमत्ता पाडा अन्यथा त्यासाठी संबंधित व्यक्तीच जबाबदार राहील, अशी नोटीस बजावली आहे.**

यंदा नगर परिषदेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात १२३ जीर्ण धोकादायक इमारती असल्याचे पुढे आले. त्यांना पालिकेने नोटीस बजावली. पण, हा गेल्या पाच सहा वर्षापासून नगर परिषदेचा नित्याचाच उपक्रम झाला आहे. पावसाळा आला की सर्वेक्षण करा, जीर्ण इमारत मालकांना नोटीस बजावा एवढेच काम केले जाते, त्याच्यापुढे कधीच ही मोहीम पुढे जात नाही. नोटीस बजावूनही इमारत

## नाल्यांवरील अतिक्रमणाकडे दुर्लक्ष

**शहरात मोठे प्रमुख चार नाले आहेत. त्या नाल्यांवर गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले. त्यामुळे पावसाळ्यात पाणी वाहून जाण्यास जागा नाही. परिणामी परिसरातील वस्त्यांमध्ये पाणी शिरते. त्यात गौरीनगर, संजयनगर, परमात्मा एकनगर, रिंग रोड, छोटा गोंदिया आदी भागांचा समावेश आहे. अशाच प्रकारातून गेल्या पावसाळ्यात फुलचूर नाक्याजवळ असलेला एक घर वाहून मायलेकाचा मृत्यू झाला होता. पण यानंतरही पालिकेने यापासून कुठलाच बोध घेतला नाही.**

मालकाने इमारत पाडली नाही तर नगर परिषदेने ती पाडल्याचे आतापर्यंत तरी शहरवासीयांनी अनुभवले नाही. त्यामुळे जीर्ण इमारतींचा धोका शहरवासीयांना कायम आहे. विशेष म्हणजे काही इमारती या रस्त्यालगत असून या मार्गावर सतत वर्दळ असते. अशात जीर्ण इमारत कोसळून जीवितहानी झाल्यास त्याला जबाबदार कोण असा प्रश्नसुद्धा कायम आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथील घटनेनंतर जीर्ण इमारतींचा प्रश्न पुन्हा गंभीर झाला आहे.

# इटियाडोहासाठी सुविधा उपलब्ध करणार-आ.राजकुमार बडोले

अर्जुनी मोरगाव:– इटियाडोह प्रकल्प हा गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगावतालुक्यातील जलस्त्रोताचा एक मोठा आधार आहे. दरवर्षी पावसाळ्यात धरण ओसांडून वाहते आणि पाण्याचा लाभ शेती व इतर विविध गरजांसाठी मिळतो. हा प्रकल्प केवळ शेतीपुरता मर्यादित नसून पर्यटनाच्या दृष्टीनेही तो अत्यंत आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. ओव्हरफ्लो झालेला धरण परिसर पर्यटकांसाठी निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्याचे ठिकाण ठरतो. या प्रकल्पस्थळी बोटींग व्यवस्थेसह इतरही सोयी–सुविधा उपलब्ध करून देण्यावर आपला भर असणार आहे. प्रतिपादन आ. राजकुमार बडोले यांनी केले.

अर्जुनी–मोरगाव तालुक्यातील इटियाडोह



प्रकल्पाच्या जल पूजनाचा शासकीय सोहळा शुक्रवारी (दि.२२). बडोले तसेच जिल्हाधिकारी प्रजित नायर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. त्यावेळी विश्रामगृहात झालेल्या छोटे खानी सभेत आ. बडोले बोलत होते. यावेळी शेतकऱ्यांच्या सुख सुविधेसाठी व भरपूर उत्पन्नासाठी त्यांनी वरुणराजाकडे साकडे घातले.

इटियाडोह प्रकल्पातून भंडारा, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यातील हजारो हेक्टर शेतीला सिंचन होतो. या प्रकल्पातील पाटचाऱ्या, कालवे, वअत्यंत पुरातन असून जीर्ण अवस्थेत आले आहेत. त्यांचे दुरुस्तीसाठी व जीर्णोद्धारासाठी शासनस्तरावर आपले प्रयत्न सुरु असल्याचेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी पाणी वाटप समिती अध्यक्ष शिवनारायण पालीवाल, पंचायत समिती सभापती आमपाली डोंगरवार, जि. प. उपाध्यक्ष तथा सदस्य यशवंत गणवीर, उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे, तहसीलदार अनिरुद्ध कांबळे, कार्यकारी अभियंता बाघ इटियाडोह सोनाली सोनुले, उपविभागीय अभियंता समीर बनसोड, माजी जि. प सदस्य किशोर तरोणे, रतिराम राणे, गोठणगाव संरपच संजय ईश्वार, प्रतापगड संरपच भोजू लोगडे, पंचायत समिती सदस्य होमराज पुस्तोडे, तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, राजहंस ढोके, विजय कापगते, संजय खरवडे, पराग कापगते, सह पदाधिकारी तथा इटियाडोह पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पर्यटक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोहारा ग्रामपंचायतमध्ये मनरेगाच्या कामात भ्रष्टाचार

**सालेकसा :–** तालुक्यातील लोहारा ग्रामपंचायतने मनरेगा अंतर्गत विविध कामे मंजूर करून या कामावर गावातील रोजगार सेवकाने सरपंच विजय भोयर आणि ग्रामपंचायत सदस्य अतुल निमकर व इतर सहकाऱ्यांच्या मदतीने बोगस मजुरांच्या नावाने मजुरी काढून लाखो रुपयांचा घोळ केल्याचा आरोप आहे. ग्रामपंचायत सदस्य व त्यांच्या कुटुंबातील लोकांचे नाव सुद्धा मस्टरवर टाकून कामावर न जाता मजुरीची उचल केल्याचे उघडकीस आले आहे. या प्रकाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी गावातील युवा संघटना व गावकऱ्यांनी केली आहे.

मनरेगा योजनेच्या माध्यमातून जाब कार्डधारक मजुरांना किमान १०० दिवस काम मिळते. परंतु लोहारा येथील रोजगार सेवकाने वास्तविक काम करणाऱ्या गरजू मजुरांना काम न देता सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य यांच्या संगनमताने बोगस मजुरांचे मस्टरवर हजेरी लाऊन त्या बोगस मजुरांकडून प्रति दिवस १०० रुपये प्रमाणे कमिशन घेऊन बोगस मस्टर दाखविल्याचा



आरोप आहे. एका ग्रा. पं. सदस्याने मनरेगा अंतर्गत रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली आपल्या शेतीची जेसीबीने करून माती रस्त्यावर टाकली. तसेच मनरेगा अंतर्गत बोगस बिले काढली. याशिवाय वृक्ष लागवड व इतर कामामध्ये सुद्धा बोगस बिले काढल्याची तक्रार आहे. या सर्व भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली आहे.

गावातील युवकांनी चौकशीसाठी तहसीलदार नरसय्या कोंडागुर्ले, बीडीओ संजय पुरी, सभापती विना कटरे, जि. प. सदस्या वंदना काळे यांना निवेदन दिले आहे. शिष्टमंडळात टिकेश भलावी, ललित राऊत, नरेंद्र टेकाम, कार्तिक पटले, यशकुमार राऊत, खुशाल वरकडे, मनोज टेंभरे व गावकऱ्यांचा समावेश होता.

## सरपंच म्हणतात आरोप तथ्यहीन

**यासंदर्भात सरपंच विजय भोयर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी नेटवर्कची समस्या निर्माण झाल्याने एक दिवस हजेरी लावण्यात चूक झाली. विरोधक आकसापोटी आपल्यावर बिनबुडाचे आरोप करीत आहे. माझ्यावरील आरोप तथ्यहीन असल्याचे सांगितले.**

**लोहारा ग्रामपंचायतमध्ये मनरेगा अंतर्गत गैरप्रकार झाल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विस्तार अधिकारी यांना जवाबदारी दिली आहे. चौकशीनंतर यात दोषी आढळणाऱ्यांवर निश्चित कारवाई केली जाईल.**

**संजय पुरी, गटविकास अधिकारी सालेकसा**

# मनीच्या तंमुस अध्यक्षपदी राजेश आंबेडारे

**गोंदिया:–**तालुक्यातील टेमनी येथील महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी समाजसेवक राजेश आंबेडारे यांची एकमताने निवड करण्यात आली. येथील ग्रापंचायत भवनात २१ रोजी अध्यक्ष निवडीसाठी ग्राम सभा आयोजित करण्यात आली होती. सभेत गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत त्यांची तंटा मुक्त समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.आंबेडारे यांची निवड होताच गावकऱ्यानी रैली काढून त्यांचे जल्लोषात स्वागत केले. आंबेडारे यांच्या निवडीबद्दल पो. पा. प्रियंका



नांदने, उपसरपंच शैलेश डोंगरे, माणिक पटले, ईश्वर वंजारी विजय खोब्रागडे, गणेश आंबेडारे, मधोराव आंबेडारे, योगेंद्र ठाकरे, मोहन बिसेन, किशोर पटले, नरेश परीहार, देवानंद गेडाम, रमेश कुंभरे, राजेश डोंगरे, गिरधारी सराटे, ममिता आंबेडारे, प्रमिला खोब्रागडे, मंजु पंधरे, दुर्गा राऊत, कांता कुंभरे, आरती बिसेन, सुरमन बाई रहांगडाले यांनी त्यांचे अभिनंदन केले

## पुलाच्या मध्यभागी पडला मालवाहक ट्रक

**देवरी :–** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा वरून रायपुर कडून नागपूरकडे जात असताना मालवाहक कंटेनर क्र.एनएल ०१– एजी ७०७४ बाम्हनी/खडकी येथील नाल्यावरील पुलाच्या मधोमध सकाळी सहा वाजे दरम्यान पडला. त्या गाडीवर चालक व वाहक दोघेच होते. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही. मिळालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे ट्रकचा टायर फुटल्यामुळे ट्रक अनियंत्रित झाला व सदर अपघात घडला. अपघात इतका भीषण होता की त्यावेळेला मोठी अनुचित घटना घडू शकली असती.

# महिलेचा खून करून ७ महिन्याच्या बाळाची विक्री,७ आरोपी जेरबंद



**गोंदिया: –** सडक–अर्जुनी तालुक्याच्या खजरी शेतशिवारात सापडलेल्या एका अनोळखी महिलेच्या खून प्रकरणाचा थरारक उलगडा गोंदिया स्थानिक गुन्हे शाखेने केला आहे. केवळ खूनच नव्हे तर मृत महिलेच्या सात महिन्याच्या मुलाची विक्री करण्यामागील टोळीचा भांडाफोड करीत सात आरोपींना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.

३ ऑगस्ट रोजी खजरी शेतशिवारात २०–२५ वर्षे वयाच्या महिलेचा मृतदेह सापडला होता. धारदार शस्त्राने वार करून खून करण्यात आल्याचे तपासात स्पष्ट झाले. इंद्रराज राऊत यांच्या तक्रारीवरून डुग्गीपार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे मृत महिलेची ओळख पटली. ती अन्नु नरेश ठाकुर (२१) रा. भिलाई, दुर्ग, छत्तीसगड असल्याचे निष्पन्न झाले. मुख्य आरोपी अभिषेक सिद्धार्थ तुरकर (३६) रा. भिलाई, ह.मु. डोंगरुटोला गोरेगाव, गोंदिया हा अन्नुशी अनैतिक संबंधात होता. मोठ्या कर्जामुळे पैशांच्या गरजेतून त्याने पत्नी पूनम तुरकर, नातेवाईक प्रिया तुरकर आणि साथीदार चांदणी रा. नेहरू नगर, भिलाई यांच्या मदतीने कट रचला. २ ऑगस्ट रोजी अभिषेकने अन्नुला खजरी शेतशिवारात नेऊन चाकूने हत्या केली. नंतर तिच्या सात महिन्याच्या मुलगा धनराज याचे बनावट जन्म प्रमाणपत्र तयार करून मुलाची विक्री करण्यात आली. या प्रकणातील सातही आरोपींना २२ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आले.

आरोपी अभिषेक सिद्धार्थ तुरकर, पूनम तुरकर, प्रिया तुरकर, सुरेखा रमेश चौहान, प्रिती

## गोंदियातील लोकांनी घेतले मूल

**आरोपींनी सुरेखा रमेश चौहान, रा. गड्डाटोली, गोंदिया, प्रिती विकास कडबे, रा. कस्तुरबा वार्ड, कचरा मोहल्ला, गोंदिया, भावेश अशोक बन्सोड, रा. मनोहर कॉलनी, रामनगर, गोंदिया, कमल सुकलाल यादव, रा. गड्डाटोली, गोंदिया यांच्या मुलाला विक्रीचा सौदा करून मुल विक्री केला.**

कडबे, भावेश अशोक बन्सोड, कमल यादव या सात जणांना अटक केली आहे. त्या आरोपींना पुढील तपासासाठी डुग्गीपार पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या निर्देशाप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पुरूषोत्तम अहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धिरज राजुरकर, महिला पोलीस उपनिरीक्षक वनिता सायकर, शरद सेदाने, सहाय्यक फौजदार राजेंद्र मिश्रा, पोलीस हवालदार सुजित हलमारे, संजय चव्हाण, महेश मेहर, सोमेंद्रसिग तुरकर, दिक्षीतकुमार दमाहे, सुबोधकुमार बिसेन, प्रकाश गायधने, इंद्रजित बिसेन, दुर्गेश तिवारी, तुलसीदास लुटे, भुवनलाल देशमुख, भोजराज बहेकार, विठ्ठलप्रसाद ठाकरे, राजकुमार खोटेले, रियाज शेख, पोलीस शिपाई छगन विठ्ठले, हंसराज भांडारकर, संतोष केदार, राकेश इंदुरकर, सुनिल डहाके, राहुल पिंगळे, दुर्गेश पाटील, स्मिता तोंडरे, कुमुद येरणे, रोशन येरणे, योगेश रहिले, अश्विन वंजारी, लक्ष्मण बंजार, मुरली पांडे, घनश्याम कुंभलवार, राम खंडारे, तांत्रिक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल दुरशेरवार, पोलीस हवालदार रितेश लिल्हारे, रवि शहारे, राजु डोंगरे, कल्पेश चव्हाण यांनी केली आहे.

# विधानसभा क्षेत्रातील विकासकामांचा आढावा

**गोंदिया:–** गोंदिया विधानसभा क्षेत्रातील विविध महत्त्वपूर्ण अत्यावश्यक विषयांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी आ. विनोद अग्रवाल यांनी पुन्हा एकदा सक्रिय पुढाकार घेतला. या बैठकीत जिल्हाधिकारी प्रजीत नायर यांच्या नेतृत्वाखाली सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



बैठकीत आ. अग्रवाल यांनी जयस्तंभचौक येथील एक्साइज/वनविभागाची जमीन पंचायत समितीकडे हस्तांतरीत करणे, विविध शासकीय प्रकल्पांसाठी जागा उपलब्ध करून देणे, कृषी महाविद्यालय, जिल्हा ग्रंथालय, आदिवासी विद्यार्थी वसतिगृह, ओबीसी वसतिगृह, केंद्रीय विद्यालय, घनकचरा प्रकल्प, आदिवासी भवन व मागासवर्गीय विद्यार्थी वसतिगृह यांच्या संदर्भात विस्तृत चर्चा करून प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश दिले. तसेच गोंदिया शहरात नागरिकांना आधार कार्ड बनविताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आधार केंद्रांची संख्या वाढविणे, रजेगाव काटी मध्यम प्रकल्पांतर्गत सावरी, रावणवाडी व लोधीटोला येथील शेतकऱ्यांना जमिनीचे मोबदले देणे, बिरसी विमानतळासाठी पुनर्वसन बाधितांची समस्या सोडविणे व पुनर्वसन गावांमध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामांवर चर्चा करून त्या कामांचा आढावा घेण्यात आला. बिरसी विमानतळामुळे बाधित रस्त्यांची कामे व पुनर्वसनाच्या बाबींवर भर देऊन, जुन्या पुनर्वसन प्रस्तावाला रद्द करून नवीन प्रस्ताव तयार करणे, तसेच १०६ बाधित कुटुंबांना नागरी सुविधांसह दुप्पट मोबदला देणे, आधीच उखडून टाकलेल्या जुन्या कुटुंबांचे पुनर्वसन करणे यावर चर्चा करून या कामांना गती देण्याचे निर्देश दिले.

**विविध विषयांवर बैठकीत चर्चा**

कामठा रस्ता बांधकाम, पांगोली नदीचे पुनरुज्जीवन, श्रीगणेश व माँ दुर्गा तसेच इतर विसर्जनासाठी मार्ग उपलब्ध करून देणे, प्रोत्साहन रक्कमेसाठी ७/१२ ऑनलाइन प्रक्रिया पुन्हा सुरू करणे, पुजारीटोला व कासा गावाचे पुनर्वसन, माँडोदेवी पर्यटन विकास, मागील ५ वर्षांत अतिवृष्टीमुळे शेती व घरांच्या नुकसानीच्या भरपाई अनुदानाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे, बीम पोर्टलवरील अडचणी दूर करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वॉर्ड व सिंगलटोली येथे रमाई गृहनिर्माण योजनेतून (शहरी) हटविण्यात आलेल्या कुटुंबांना घरकुल मंजूर करणे व आदिवासी सांस्कृतिक समाज भवन निर्माण करणे अशा अनेक विषयांवर चर्चा करून आवश्यक दिशा निर्देश देण्यात आले.